जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४४६ दिनांक - १९/१०/२०२४**

सिंहगड पोलिस स्टेशन पुणे शहर

## रेकॉर्ड वरील गुन्हेगाराकडुन दोन पिस्टल व चार जिवंत काडतुस केले जप्त

दि.१७/१०/२०२४ रोजी सहा पोलीस निरीक्षक सचिन निकम,पोलीस उपनिरीक्षक भांडवलकर, पोलीस अमंलदार तारू,चव्हाण,मोहिते,शेडगे,पाटील,मगर,असे सिंहगड रोड पोलीस स्टेशन हद्दीत वडगाव पुलाखाली पुणे येथे आलो पेट्रोलिंग करत असता स्वप्निल मगर, विनायक मोहीते व शिवाजी क्षीरसागर यांना त्याचे खास बातमी दारामार्फत बातमी मिळाली की,दोन ते तीन इसम त्यांच्याकडे गावठी पिस्टल असुन ते नवीन कॅनोल रोड आनंदवन हेरीटेज बिल्डींग जवळ हिंगणे खुर्द पुणे येथे उभे आहे अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने सदरची बातमी मा.वरीष्ट पोलीस निरीक्षक सिंहगड रोड पोलीस ठाणे,पुणे शहर यांना कळविली असता मा.वरिष्ठांनी सदर ठिकाणी जावुन खात्री करुन पुढील योग्यती कारवाई करण्याचे आदेश दिल्याने त्यांचे मार्गदर्शनानुसार लागलीच सपोनि निकम,पोलीस उप निरीक्षक संतोष भांडवलकर, पोलीस स्टाप, असे खाजगी गाडीने वडगाव ब्रिज येथुन निघुन मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी आलो असता तीन इसम हे रोडच्याकडेला एकमेकांसोबत बाचाबाची करत असल्याचे दिसुन आले सदर इसमांची व आमची नजरा नजर होताच ते सदर ठिकाणाहुन पळुन जात असताना वरील स्टाफचे मदतीने पकडुन त्यांना त्यांचे नावे व पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नावे व पत्ता **१)राज रविंद्र जागडे वय २२ वर्षे रा.आझाद मित्रमंडळ जवळ चरवड वस्ती वडगाव बुद्रुक पुणे** व **दोन विधीसंघर्षीत बालक मिळुन आले** त्यांची अंगझडती घेता आरोपी नामे राज राजेंद्र जागडे याचे जवळ ४०,०००/-रुपये किंमतीचे एक गावठी पिस्टल व एक जिवंत काडतुस मिळुन आले तसेच दोन विधीसंघर्षीत बालक यांच्या ताब्यात ४०,०००/- रुपये किंमतीचे एक गावठी पिस्टल व तीन जिवंत काडतुस जवळ मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले असुन नमुद गुन्ह्यांचा पुढील तपास पोलीस उप-निरीक्षक संतोष भांडवलकर हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त परीमंडळ ३,पुणे शहर श्री.संभाजी कदम, मा.सहा पोलीस आयुक्त, सिंहगड रोड विभाग पुणे शहर श्री.अजय परमार, वरीष्ठ पोलीस निरीक्षक,सिंहगड पो.स्टे.श्री.राघवेद्रसिंह क्षीरसागर, पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री.उत्तम भजनावळे यांचे मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक सचिन निकम, पोलीस उप निरीक्षक संतोष भांडवलकर,आबा उत्तेकर, पोलीस अंमलदार संजय शिंदे,उत्तम तारु,पंकज देशमुख,अमोल पाटील,विनायक मोहीते,स्वप्निल मगर,शिवाजी क्षीरसागर,राहुल ओलेकर,देवा चव्हाण,सागर शेडगे,विकास पांडुळे,विकास बांदल,यांचे पथकाने केली आहे.


सिंहगड रोड पोलीस स्टेशन
पुणे शहर